महाराष्ट्र शासन

क्रमांक : शानावि-१०२६/प्र.क्र.२३/प्रशासन-५
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: २४ जुलै,२०२६.

## निविदा सूचना

अ.मु.स (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या विभागातील शासकीय वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता स्वतंत्र मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

२. सदर निविदा दिनांक ३१ जुलै, २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त निविदा दिनांक ०३ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास त्यांच्या एका अधिकृत प्रतिनिधीस उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार अ.मु.स (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-:प्रशासन ५-कार्यासन संग्रहार्थ.

Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : शावानि-१०२५/प्र.क्र.२३/प्रशा-५
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८४५२३०

वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक-: २४ जुलै, २०२६.

निविदा संदर्भात नियम व अटी.

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १. | मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष दिनांक : २७ जुलै,२०२६ ते ३१ जुलै,२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अवर सचिव, प्रशासन-५, दालन क्रमांक ३२४ विस्तार, तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या जुन्या वाहनाच्या खरेदीसाठी निविदा असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २. | "जशी आहे तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) हे जुने वाहन तपासणीसाठी मंत्रालयाच्या बाहेरील आवारात ठेवण्यात आले आहे. |
| ३. | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. निविदेसोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. (आधार कार्ड/पॅन कार्ड) |
| ४. | वाहनासाठी इसाऱ्याची रक्कम रु.५०००/-(अक्षरी रुपये पाच हजार) अवर सचिव, रोखशाखा, वित्त विभाग, दालन क्रमांक ३२४ (विस्तार), तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांच्याकडे **रोखीने किंवा डी.डी.ओ., महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नांवे इसीएस द्वारा Bank Code : 001388, Bank Name: Bank of Maharashtra, Branch Name:** Mantralaya Branch, Mumbai-४०००३२, Account No.६०३५५६०७१५१, IFSC Code: MAHB०००१३८८ येथे जमा करावी. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| ५. | वाहनासाठी इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर अवर सचिव, रोखशाखा, वित्त विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली पावती किंवा ईसीएस विवरण द्वारा, निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ६. | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल. |
| ७. | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम किंवा ईसीएस ट्रांजेक्शन द्वारा भरुन एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस त्यास मुकावे लागेल. |
| ८. | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) वित्त विभाग Registration Number : **27MUMG09454E1D8** वर भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| ९. | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १०. | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| ११. | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना राहतील. |
| १२. | वाहन क्रं. एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा) या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणी बा बत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |

(शुभांगी शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:

अवर सचिव, रोखशाखा, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner

| | निविदा माहिती | | निविदा विवरण |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | : | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | : | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक, ईसीएस/ डिमांड ड्रॉफ्ट विवरण | : | |
| ६ | निविदा सादर करावयाचा दिनांक | : | दिनांक. , २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | निविदा उघडण्याची तारीख | : | दिनांक. , २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता |

प्रति,

अवर सचिव (प्रशासन-५)
दालन क्रमांक ३३१ (विस्तार), तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०००३२.

विषय :- शासकीय वाहन क्रमांक: एमएच - ०१ एएन - ०८७३ (टोयाटो-इनोव्हा ) च्या खरेदीबाबत.

महोदय,

आपली निविदा सूचना क्र.शावानि-१०२६/प्र.क्र.२३/प्रशासन-५ दि. ,२०२६ च्या संदर्भात अवर सचिव, प्रशासन-५, दालन क्रमांक ३३१ (विस्तार), तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या आणि निविदा नमुन्यासोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार मी / आम्ही वाहन क्रमांक:------------------------------ हे वाहन/ही वाहने रुपये ------------------------- (अक्षरी रुपये -------------------------------------------------फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो. मी / आम्ही निविदेबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

आपला विश्वासू,

(निविदाधारकाची सही )
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक

टिप :- कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्यान देण्यात यावा.

Scanned with OKEN Scanner